नायब तहसीलदार “गट-ब” संवर्गातील १२ परिविक्षाधीन उमेदवारांकरीता अधिसंख्य पदे निर्माण करणेबाबत...

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांकः- ईएसटी-२०१७/प्र.क्र.१२५/ई-८
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : २८ सप्टेंबर, २०१७.

संदर्भ:- १) शासन निर्णय, वित्त विभाग, पदनि-२०१६/प्र.क्र.७/१६/वित्तीय सुधारणा-१, दिनांक २०/०२/२०१६.
२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. टिआरएन-२०१७/प्र.क्र.४७/१७/सीपीटीपी, दि. २६/०७/२०१७.
३) सामान्य प्रशासन विभागाचे पत्र क्र.टिआरएन-२०१७/प्र.क्र. ३८/ सीपीटीपी-अ, दि. १९/०७/२०१७.

प्रस्तावना:-

सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भ क्र. २ येथील शासन निर्णयान्वये सन २०१६ पासून महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत राज्यसेवा परीक्षेद्वारे प्रतिवर्षी सरळ सेवेने नियुक्त होणाऱ्या गट-ब संवर्गातील उमेदवारांसाठी वनामती, नागपूर या संस्थेमार्फत एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण देण्यात येते. त्यानुसार राज्य सेवा (मुख्य) परीक्षा-२०१६ च्या अंतिम निकालाच्या आधारे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने शिफारस केलेल्या परिविक्षाधीन नायब तहसीलदार “गट-ब” संवर्गातील प्रशिक्षणासाठी हजर झालेल्या एकूण १२ उमेदवारांचे प्रशिक्षण दिनांक ०१/०८/२०१७ पासून वनामती, नागपूर येथे सुरु झाले आहे. त्याअनुषंगाने नायब तहसीलदार “गट-ब” या संवर्गातील १२ परिविक्षाधीन उमेदवारांसाठी अधिसंख्य पदे निर्माण करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

राज्य सेवा मुख्य परीक्षा-२०१६ अंतर्गत महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने शिफारस केलेल्या व सामान्य प्रशासन विभागाने प्रशिक्षणांतर्गत कार्यक्रमासाठी नियुक्त केलेल्या १२ परिविक्षाधीन नायब तहसिलदारांसाठी “गट-ब” संवर्गातील रु.९३००-३४८०० (ग्रेड पे रु. ४३००/-) या वेतनश्रेणीतील १२ अधिसंख्य पदे दि.०१/०८/२०१७ ते दि.३१/०७/२०१९ या दोन वर्षाच्या कालावधीकरीता निर्माण करण्यास शासन मान्यता देत आहे.

२. सदर अधिसंख्य पदे दि.०१/०८/२०१७ ते दि.०६/०१/२०१८ पर्यंत विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर यांच्या आस्थापनेवर निर्माण करण्यात येत आहेत. तदनंतर सदरहू परिविक्षाधीन उमेदवारांकरीता खातेनिहाय संलग्न प्रशिक्षण/जिल्हास्तरीय प्रशिक्षणासाठी जिल्हानिहाय वाटपाबाबत शासन निर्णय निर्गमित झाल्यानंतर विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर यांच्या आस्थापनेवरील उक्त १२ अधिसंख्य पदे सदर शासन निर्णयानुसार दि.०७/०१/२०१८ त दि. ३१/०७/२०१९ या कालावधीत संबंधित जिल्ह्यांच्या आस्थापनेवर वर्ग होतील.

३. संदर्भ क्र. २ येथील सामान्य प्रशासन विभागाच्या दि.२६/०७/२०१७ च्या शासन निर्णयातील मार्गदर्शक सुचनांनुसार परिविक्षाधीन उमेदवारांना टप्पा-१ चे ८ आठवड्यांचे “पायाभूत प्रशिक्षण” आणि त्यानंतर ६ आठवड्यांची “अनिवार्य संलग्नता” अशा दि.०१/०८/२०१७ ते दि.०५/११/२०१७ या १४ आठवड्यांच्या कालावधीकरीता नायब तहसीलदार, गट-ब संवर्गातील उमेदवारांना दरमहा रु. २०,०००/- इतके ठोक वेतन वनामती, नागपूर या संस्थेमार्फत अदा करण्यात येईल. त्याकरीता वनामती, नागपूर या प्रशिक्षण संस्थेस विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर यांनी अग्रिम निधी उपलब्ध करुन द्यावा.

सदर १४ आठवड्यांचे प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर या उमेदवारांना दि.०६/११/२०१७ ते दि.०६/०१/२०१८ या कालावधीतील नियमित वेतन व आधीच्या १४ आठवड्यांच्या कालावधीत अदा करण्यात आलेली ठोक वेतनाची रक्कम आणि प्रत्यक्ष वेतन यामधील फरकाची रक्कम एक रकमी विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर यांच्यामार्फत अदा करण्यात यावी. तदनंतर सदरहू परिविक्षाधीन उमेदवार खातेनिहाय संलग्न प्रशिक्षण/जिल्हास्तरीय प्रशिक्षणासाठी जिल्ह्यांकडे रुजू झाल्यानंतर दि.०७/०१/२०१८ ते दि.३१/०७/२०१९ या कालावधीतील प्रशिक्षण पूर्ण होईपर्यंतचे वेतन संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयाने अदा करण्याची कार्यवाही करावी.

४. सदरहू परिविक्षाधीन नायब तहसिलदार यांच्या पायाभूत प्रशिक्षण, अनिवार्य संलग्नता व तांत्रिक प्रशिक्षणाच्या दि.०१/०८/२०१७ ते दि. ०६/०१/२०१८ या कालावधीतील अधिसंख्य पदावर होणारा खर्च “मागणी क्र. सी-१, २०५३-जिल्हा प्रशासन, (०१) सर्वसाधारण आस्थापना (००) १०१,

आयुक्त (०१) (०५) आयुक्त नागपूर (२०५३ ०४६७), ०१-वेतन” या लेखाशिर्षाखालील मंजूर अर्थसंकल्पीय अनुदानातुन भागविण्यात यावा. तसेच सदर परिविक्षाधीन उमेदवार जिल्हानिहाय प्रशिक्षणासाठी वर्ग केलेल्या जिल्ह्यांकडे हजर झाल्यानंतर त्यांच्या दि.०७/०१/२०१८ ते दि.३१/०७/२०१९ या कालावधीत सदर अधिसंख्य पदांवर होणारा खर्च “ मागणी क्र. सी-१, २०५३- जिल्हा प्रशासन (००)(०९३) जिल्हा आस्थापना (०१) सर्व साधारण आस्थापना (०१)(०१) आयुक्त कोकण (२०५३ ००२८)/ आयुक्त नाशिक (२०५३ ००४६)/ आयुक्त पुणे (२०५३ ००६४)/ आयुक्त अमरावती (२०५३ ००८२)/ आयुक्त नागपूर (२०५३ ०१०८)/ आयुक्त औरंगाबाद (२०५३ ०१२६) या लेखाशिर्षाखालील मंजूर अर्थसंकल्पीय अनुदानातुन भागविण्यात यावा.

५. संदर्भीय शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. पदनि २०१६/प्र.क्र.७/१६/वित्तीय सुधारणा-१, दि.२०/०२/२०१६ अन्वये प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार सदर शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१७०९२८१२००२९४९१९ असा आहे. उक्त शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

Nilkanth Pandurang Awhad

Digitally signed by Nilkanth Pandurang Awhad
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue And Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=e42a88b7548c3a7d48b7a77d85de3524cf8f2e7e0f87091223ad803d4d4a2a31, cn=Nilkanth Pandurang Awhad
Date: 2017.09.28 15:29:24 +05'30'

(नि. पां. आव्हाड)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर.
२) जिल्हाधिकारी (सर्व).
३) महासंचालक, वसंतराव नाईक राज्य कृषि विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था, नागपूर.
४) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
५) निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
६) जिल्हा कोषागार अधिकारी (सर्व).

७) प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा), महाराष्ट्र - १/२, मुंबई/नागपूर.
८) उप सचिव, (वित्तीय सुधारणा-१) वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२.
९) अवर सचिव (कार्यासन-१८ ब) सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२.
१०) सह सचिव (कार्यासन ब-१/ई-९) महसूल व वन विभाग, मंत्रालय,मुंबई - ३२.
११) निवड नस्ती, कार्यासन ई-८, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२.